Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

SPECIAL ISSUE
"INDIAN FOREIGN POLICY AND PRESENT SCENARIO"



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned by CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मोदी सरकारचे परराष्ट्र धोरण<br>प्रा. विलास एस. टाले | १-६ |
| २ | भारताच्या परराष्ट्र धोरणात बालगुन्हेगारी (विधि संघर्ष ग्रस्तबालक : एक सामाजिक समस्या)<br>राजपूत विलास भगतसिंग | ७-१२ |
| ३ | भारतातील बाल गुन्हेगारीचे स्वरुप व समस्या : एक अभ्यास<br>धाबे संजय किसन | १३-१८ |
| ४ | भारताचे प्रमुख राष्ट्राशी असलेले संबंध<br>शेख जब्बार खलील | १९-३० |
| ५ | भारत आणि अलिप्ततावादी संघटना<br>खंडेराव हरिभाऊ काळे | ३१-३६ |
| ६ | संयुक्त राष्ट्रांच्या विविध संघटनांत भारतीयांचे योगदान<br>डॉ. निर्मळ बी. ए.<br>गोविंद मधुकर खाडप | ३७-३८ |
| ७ | भारताच्या परराष्ट्र धोरणची वाटचाल व आव्हाने<br>डॉ. आर. के. वाघचौरे | ३९-४२ |
| ८ | ब्रिक्स संघटना आणि भारताची भूमिका<br>प्रा. शौ. सुपेकर व्हि. पी. | ४३-४६ |
| ९ | भारतीय परराष्ट्र धोरणासमोरील आव्हाने<br>प्रा. डॉ. अशोक मारोती इंगोले | ४७-४९ |
| १० | भारताचे परराष्ट्र धोरण व आशियातील चीनचा विस्तारवाद : एक अभ्यास<br>श्री निकम राजाराम दिगंबर<br>डॉ. एच. एस. भूमकर | ५०-५३ |
| ११ | भारताचे परराष्ट्र धोरण व जागतिक संघटना : ऐतिहासिक आढावा<br>श्री चिकटे व्यंकट दगडू | ५४-५७ |
| १२ | भारताचे परराष्ट्र धोरण व पंडित नेहरु<br>प्रा. मुनेश्वर ता. झमईवार | ५८-६३ |




Scanned by CamScanner
Scanned with OKEN Scanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ८. ब्रिक्स संघटना आणि भारताची भूमिका

**प्रा. सौ. सुपेकर व्हि. पी.**
विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग, अण्णासाहेब आवटे कॉलजे, मंचर.

## प्रस्तावना

जगातील प्रत्येक राष्ट्राला आपला विकास करण्यासाठी दुसऱ्या राष्ट्रांची गरज असते कारण कोणतेही राष्ट्र स्वावलंबी नसते.प्रत्येक राष्ट्राला आपले हित साध्य करण्यासाठी उत्तम परराष्ट्र धोरणाची गरज असते.भारताने सुद्धा विशिष्ट अशा धोरणाचा विकास केला आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा विकास साधारणपणे तीन टप्प्यांमध्ये झालेला दिसून येतो.यातील १८८५ ते १९४७ हा पहिला टप्पा मानता येईल कि जो स्वांतत्र्यापूर्वीचा मानता येईल.दुसऱ्या टप्प्यात पंडित नेहरू यांनी स्वतंत्र भारताचे नेतृत्व केले आणि भारताच्या परराष्ट्र धोरणात लोकशाही,,उदारमतवाद, मिश्र अर्थव्यवस्था या तत्वांचा स्वीकार केला.रशिया आणि अमेरीका या दोन्ही महासत्तांपासून दूर ठेवून दोन्ही देशांशी मैत्री ठेवून अलिप्ततावादाचा पुरस्कार केला.१९९०-१९९१ पर्यंत भारताचे परराष्ट्र धोरण स्थिर होते.,मात्र जागतिकीकरणामुळे त्याचे स्वरुप मात्र बदलत गेलेले दिसते.भारताने आपल्या राजनैतिक हितसंबंध जपण्याबरोबरच आर्थिक हितसंबंधाना प्राधान्य देण्यास सुरुवात केली, हे धोरण अधिक वास्तववादी बनले. राष्ट्राराष्ट्रातील आर्थिक सहकार्य आणि संवाद वाढावा यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक संघटना देखील जागतिकीकरणाच्या नंतरच्या काळात निर्माण झालेल्या दिसून येतात, 'ब्रिक्स' हि संघटना देखील अशीच एक संघटना आहे कि ज्याच्या माध्यमातून भारत आणि चीन सारखे देश,ज्या दोन्ही देशांमध्ये १९६२ च्या युद्धानंतर संवाद नव्हता,त्या दोन देशांमध्ये केवळ 'ब्रिक्स' सारखे व्यासपीठ उपलब्ध झाले. या संघटनेमुळे भारताला अतिशय व्यापक अशा संधी प्राप्त होत गेल्या त्याचाच अभ्यास या पेपर मध्ये करण्याचा प्रयत्न झाला आहे.

## उद्दिष्टे

१) भारताच्या बदलत्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करणे.

२) आंतरराष्ट्रीय राजकारणातील संघटनाचे महत्व जाणून घेणे.

३) भारताचे शेजारील देशांशी असलेले संबंध अभ्यासणे.



Scanned by CamScanner
Scanned with OKEN Scanner

**ब्रिक्स ची स्थापना**

भारत,ब्राझील,रशिया,चीन आणि दक्षिण आफ्रिका या देशांच्या शिखर संघटनेचे नाव ब्रिक्स आहे.सुरुवातीला फक्त चार देश या संघटनेचे सदस्य होते.२०१० मध्ये दक्षिण आफ्रिका हा देश या संघटनेमध्ये सामील झाला.या संघटनेमधील सर्व देशांची अर्थव्यवस्था अतिशय वेगाने वाढते आहे. जगाच्या भूमीच्या जवळपास १/४ भूमी ब्रिक्स च्या राष्ट्रसमुहाने व्यापली आहे. तसेच जगाच्या लोकसंखेच्या ४०% लोकसंख्या या समूहाची आहे. प्रत्येक वर्षी सदस्य देशांमध्ये याची शिखर परिषद होते.

**शिखर परिषदा**

| परिषद | दिनांक | यजमान देश | शहर |
|---|---|---|---|
| पहिली परिषद | १६ जुन २००९ | रशिया | येकातेरीनबुर्ग |
| दुसरी परिषद | १५ एप्रिल २०१० | ब्राझील | ब्राझिलिया |
| तिसरी परिषद | १४ एप्रिल २०११ | चीन | -- |
| चौथी परिषद | २९ मार्च २०१२ | भारत | नवी दिल्ली |
| पाचवी परिषद | २६-२७ मार्च२०१३ | दक्षिण आफ्रिका | डर्बन |
| सहावी परिषद | १४-१६जुलै २०१४ | ब्राझील | फोर्तालेझा आणि ब्राझिलिया |
| सातवी परिषद | ८-९ जुलै २०१५ | रशिया | उफा |
| आठवी परिषद | १५-१६ ऑक्टोबर २०१६ | भारत | गोवा |
| नववी परिषद | ३-५ सप्टेंबर २०१७ | चीन | शियामेन |
| दहावी परिषद | २५-२७ जुलै २०१८ | दक्षिण आफ्रिका | जोहान्सबर्ग |

आतापर्यंत या संघटनेच्या एकूण दहा परिषदा पार पडलेल्या आहेत. प्रत्येक परीषदेमध्ये भारताने आपली भूमिका ठामपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.भारताचे या संघटनेमधील योगदान खालील मुद्द्यांच्या आधारे बघता येईल.

**१) दहशतवादाविरोधी मुद्दा**

जागतिक शांततेचा मार्ग सातत्याने अडथळ्याणे भरलेला आहे.दहशतवादासारखी समस्या मानवी हक्क धोक्यात आणत आहे.भारतासारख्या देशाला तर धार्मिक दहशतवादाने अतिशय ग्रासले आहे.भारत संधी मिळेल तसे आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरून दहशतवादाचा निषेध व्यक्त करतो. दक्षिण आफ्रिकेमध्ये जेव्हा ब्रिक्स ची दहावी शिखर परिषद पार पडली,त्यवेळी भारताने हा मुद्दा खंबीरपणे मांडला.आंतरराष्ट्रीय क्षेत्रात चीन भारतापुढे अनेक आव्हाने



Scanned by CamScanner
Scanned with OKEN Scanner

निर्माण करू पाहत आहे.चीनसोबतची वाढती व्यापारी तूट,जैश-ए-मोहम्मदचा म्होरक्या मसूद अझहरच्या मोकळे पाळणे,डोकलाम आणि लडाख या भागात चीनी सैन्याकडून होणारी घुसखोरी,चीनी विस्तारवाद या बाबींमुळे आपल्या चीन पासून धोका आहे.भारताने या परिषदेमध्ये दहशतवादाविरोधी मुद्दा मांडून जगातील विविध राष्ट्रांचा पाठिंबा मिळविला. ब्रिक्स च्या निमित्ताने भारताने डोकलाम आणि दहशतवाद या दोन्हीबाबत राजनैतिक विजय मिळविला आहे.

२०१७ मध्ये चीन मध्ये शियामेन येथे जी ब्रिक्स परिषद झाली तेथे देखील पाकिस्तान देत असलेल्या राजाश्रयामुळे भारत व निष्पाप नागरिक बळी पडत आहेत,हि भारताची बाजू पंतप्रधान यांनी मांडली.चीनप्रमाणेच पाकिस्तानच्या विघातक धोरणावर देखील प्रखर टीका भारत करताना दिसतो. आंतरराष्ट्रीय लवादासमोर कुलदीप जाधवच्या तथाकथित हेरगिरी प्रकरणात पाकिस्तानची झालेली नाचक्की,तेथील राजकीय अस्थिरता आणि त्यातून झालेले सत्ताबदल हे पाकिस्तानचे वैशिष्ट्य आहे. विविध पातळीवर पाकिस्तानचे खच्चीकरण होत आहे.ब्रिक्स मध्ये भारताने पाकिस्तानवर टीका केली आहे.ब्रिक्स च्या सदस्यांनी आपल्या ४३ पानाच्या जाहिरनाम्यात अनेक दहशतवादी संघटनांचा उल्लेख करून या संघटनेचे पालनपोषण करणाऱ्या पाकचा 'दहशतवादाची जननी' म्हणून उल्लेख केला.चीनकडे यजमानपद असल्यामुळे चीनला सुद्धा पाकिस्तानबाबत कठोर भूमिका घ्यावी लागली.चीन मध्ये सिकियांग प्रांतातील दहशतवाद हा पाकमधूनच आयात होतो,हि बाब जमेस धरून चीनने भारताच्या भूमिकेस पाठिंबा दिला.

२) डोकलाम प्रश्न

चीन हा जगातील एकमेव असा देश आहे कि ज्याचे १५ देशांबरोबर सीमावाद आहेत.चीन हा सीमेवरचा आपला दावा कधीही सोडत नाही. आणि तो भूभाग मिळविण्यासाठी कोणत्याही पातळीपर्यंत जाब्रिक्सवू शकतो.भारत व चीन यांचे संबंध डोकलाम प्रदेशावरून ताणले गेलेले आहेत.आशियातील भारत,चीन आणि भूतान या तीन देशांची सीमारेषा डोकलाम मध्ये मिळते. या भागात चीनने रस्ता बांधण्यास सुरुवात केली आणि भारताने यावर आक्षेप घेतला. या दोन्ही देशांमध्ये संघर्ष निर्माण झाला होता परंतु ब्रिक्स च्या निमित्ताने चीनी व भारतीय सैन्याने डोकलाम मधून शांततेने माघार घेतली.यामागे ब्रिक्स या संघटनेच्या व्यासपीठाचे योगदान मान्य करावे लागेल.

३) आर्थिक विकासाला चालना

भारतासाठी ब्रिक्स हि जागतिक पातळीवर नेतृत्व करण्याची संधी असलेली संघटना आहे. दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे झालेल्या परिषदेत जे सामाईक निवेदन जाहीर केले गेले त्यामध्ये व्यापार,आंतरराष्ट्रीय दहशात्वाद,विस्थापितांचे प्रश्न,शिक्षण,आरोग्य, आणि संयुक्त राष्ट्रांनी दिलेली शाश्वत विकासाची उद्दिष्टे या अनेक



Scanned by CamScanner
Scanned with OKEN Scanner

विषयावर मते मांडण्यात आली. ब्रिक्स देशांतर्गत स्थापण्यात आलेल्या ब्रिक्स डेव्हलपमेंट बँकेच्या माध्यमातून जागतिक नाणेनिधी आणि जागतिक बँक यांची मक्तेदारी मोडून समांतर वित्तीय व्यवस्था निर्माण केली जाणार आहे. आणि या बँकेचे अध्यक्षपद भारताला मिळाले.याचा अर्थ असा काढता येईल कि ब्रिक्स च्या व्यासपीठाचा आधार घेऊन भारताला आशिया खंडाच्या राजकारणावर प्रभाव पडता येईल. या बँकेवर चीनची मक्तेदारी निर्माण होऊ न देण्यासाठी भारताने 'एक देश एक मत' हा एक महत्वाचा मुद्दा मांडला.दुसरे म्हणजे ५० अब्ज डॉलरचे बीजभांडवल आहे त्यापैकी १० अब्ज डॉलर प्रत्येक देश देणार म्हणजे प्रत्येक देशाचे समान मत असेल. भविष्यात चीनच्या आव्हानाला थोपवण्यासाठी भारताकडून प्रयत्न केले जात आहेत.

## निष्कर्ष

वरील बाबींचा विचार करता असा निष्कर्ष काढता येईल कि ब्रिक्स सारख्यां बहुराष्ट्रीय संघटनांच्या माध्यमातून भारत जागतिक राजकारणावर प्रभाव पाडण्याचा निश्चितच प्रयत्न करत आहे.या पूर्वीच्या नाम सारख्या ज्या संघटना होत्या कि ज्या आधारे भारताने आपला प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता,त्या आता कालबाह्य झाल्या झाल्या आहेत.त्या तुलनेत ब्रिक्स सारखी संघटना भारतासाठी एक नवीन व्यासपीठ आहे असे म्हणता येईल. भारताला पुन्हा एकदा या निमित्ताने आशिया खंडाच्या राजकारणावर आपला प्रभाव पडता येईल.

## संदर्भ

१) डॉ.शैलेंद्र देवळाणकर – भारत आणि जग,सकाळ प्रकाशन,डिसेंबर २०१४.

२) Changing Indian Foreign policy -ISBN978-93-24457-17-6,30 &31 January 2017.

३) डॉ वसंत रायपुरकर -आंतरराष्ट्रीय संबंध,२००१,पृष्ठ क्र.१७५

४) ब्रिक्सः भारताला महासत्ता बनवू पहणारा राजमार्ग-प्रभात वृत्तसेवा,ऑगस्ट १७,२०१८.

५) ब्रिक्स- जागतिक राजकारणाची फेररचना –दिव्य मराठी लेख सप्टेंबर ९, २०१७.



Scanned by CamScanner

Scanned with OKEN Scanner